प्रश्न : login होत नाही.
उत्तर : पोर्टल वरील अर्ज स्व प्रमाणित नाही त्यामुळे login होत नाही.
प्रश्न : अर्ज स्व प्रमाणित आहे तरीही login होत नाही
उत्तर : असे असेल तर स्व प्रमाणित अर्जाची प्रत ९०२८०६२६९८ यावर आयडी सह पाठवावी.
प्रश्न : अर्ज स्व प्रमाणित आहे हे कसे ओळखावे
उत्तर : स्व प्रमाणित प्रतीवर watermark असून त्यामध्ये स्वाक्षरी दिसून येते. Draft Copy असेल तर ती स्व प्रमाणित नाही.
प्रश्न : मी या पूर्वी माझा अर्ज स्व प्रमाणित (self Certify ) केलेला नाही आता करता येईल का
उत्तर : आता या भरती साठी करता येणार नाही.
प्रश्न : माझ्या स्व प्रमाणित (self Certify ) अर्जामध्ये कुठलीही माहिती मध्ये बदल करता येईल काय
उत्तर : आता या भरती साठी करता येणार नाही.
प्रश्न : माझ्याकडे Ded/Bed हि अर्हता असतानाही व्यावसायिक अर्हतेमध्ये पूर्वी माहिती भरलेली नाही ती मला आता भरता येईल का
उत्तर : आता या भरती साठी करता येणार नाही.
प्रश्न : invalid url/page Blank/ form save न होणे/ Horizontal category भरल्यावर save होत नाही असा संदेश येतो काय कारण आहे
उत्तर : सर्वर स्लो असल्याने असा संदेश येतो. काही वेळानंतर पुन्हा login केल्यावर करता येईल.

प्रश्न: Preferance मागील round पेक्षा कमी आहे आहेत.
उत्तर : आपल्या साठी नव्याने प्राप्त Preferance मध्ये आणि मागील वेळी आलेल्या प्राधान्य क्रमामध्ये तफावत असल्यास न आलेली Preferance आपल्या अर्हतेसोबत पडताळून पहावेत. त्यामध्ये पात्रतेनुसार माध्यम, दि २२/११/२०१७ रोजी असलेली शैक्षणिक,व्यावसायिक विचारात घेतलेली आहे.

प्रश्न : माझे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असताना मला उर्दू या व अन्य माध्यमाच्या जागा दिसत आहेत
उत्तर : भाषा विषयासाठी उमेदवाराची पदवी,पद्व्युतर पदवी ज्या भाषा विषयातून असेल त्या भाषा विषयासाठी सर्व माध्यमाच्या जागा दाखविण्यात आलेल्या आहेत. उमेदवार या सर्व जागासाठी पात्र असेल. परंतु उमेदवारास त्याच्या भाषा विषयातून शिकविता आले पाहिजे. यासाठी उमेदवाराची निवड झाल्यानंतर परीविक्षा कालावधी मध्ये क्षमता चाचणी घेतली जाईल त्यात उतीर्ण होणे बंधनकारक राहील.
प्रश्न : प्रणाली मार्फत प्राधान्यक्रम Generate करताना कोणते माध्यम विचारात घेण्यात आलेले आहेत.
उत्तर : १. अपद्वीधर ( इ १ ली ते ५ वी ) पदासाठी – माध्यमिक, उच्च माध्यमिक, शिक्षण शास्त्र पदविका(डी.एड.) या स्तरावरील शिक्षण झालेले माध्यम
२. पद्वीधर ( इ ६ वी ते ८ वी ) पदासाठी –उच्च माध्यमिक, पदवी, शिक्षण शास्त्र पदविका(डी.एड.), शिक्षण शास्त्र पदवी (बी.एड.) या स्तरावरील शिक्षण झालेले माध्यम
३. पद्वीधर ( इ ९वी ते १० वी ) पदासाठी –उच्च माध्यमिक, पदवी, शिक्षण शास्त्र पदवी (बी.एड.) (बीपीएड (शारीरिक शिक्षण पदासाठी) या स्तरावरील शिक्षण झालेले माध्यम
४. पद्वीधर ( इ ११वी ते १२वी ) पदासाठी –पदवी, पद्व्युतर पदवी, शिक्षण शास्त्र पदवी (बी.एड.) या स्तरावरील शिक्षण झालेले माध्यम.
प्रश्न : मी पोर्टलवर दिलेल्या माहिती वरून मला आलेल्या जागाचे प्राधान्यक्रम आलेले आहेत Document Verification च्या वेळी अडचण येईल का
उत्तर : उमेदवाराने स्व:प्रमाणपत्र मध्ये दिलेल्या माहिती च्या आधारे प्राधान्य क्रम उपलब्ध झालेले आहेत. प्रधायाक्रम देताना कोणतेही कागदपत्र पडताळून देण्यात आलेले नाहीत त्यामुळे उमेदवाराच्या कागदपत्राची पडताळणी त्या त्या नियुक्ती प्राधिकारी यांचे कडून होणार असल्याने त्यात अपात्र ठरल्यास उमेदवार निवड प्रक्रियेतून बाद ठरणार आहे. त्यामुळे उमेदवाराने नियमातील तरतुदी विचारात शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता असल्याची खात्री करूनच योग्य प्राधान्यक्रमच Preferances Lock करावेत.
प्रश्न : मी एकाच विषयात पदवीधर असताना मला दोन/तीन विषयात प्राधान्यक्रम आलेले आहेत की काय करू
उत्तर : आपणास आलेले प्राधान्यक्रम हे आपण स्व: प्रमाणपत्र मध्ये नमूद केलेल्या विषयातील आलेले आहेत, त्यासाठी आपणास उच्च प्राथमिक ( ६ ते ८ ) / माध्यमिक ( ९ वी ते १० वी ) साठी मान्यताप्राप्त विध्यापिठाची संबधित विषयातील पदवी परीक्षेस अंतिम वर्षास संबंधित विषयातील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार प्राप्त आवश्यक आहे. तसेच उच्च माध्यमिक ( ११ वी ते १२ वी ) साठी मान्यताप्राप्त विध्यापिठाची संबधित विषयातील पद्व्युतर पदवी परीक्षेस अंतिम वर्षास संबंधित विषयातील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार प्राप्त असणे आवश्यक आहे. हि तरतूद विचारात घेऊन आलेल्या प्राधान्यक्रमातून योग्य प्राधान्यक्रम LOCK करावेत.

प्रश्न : संपूर्ण शिक्षण इंग्रजी माध्यामतून शिक्षण झालेल्या उमेदवारांना मराठी जागा दिसत नाहीत
उत्तर : संपूर्ण शिक्षण इंग्रजी मध्ये झालेले असल्याने त्यांच्या अर्हतेमध्ये अन्य माध्यम नाही त्यामुळे त्यांना अन्य माध्यमाच्या जागा दिसत नाहीत
प्रश्न : लॉगिन वर You are not eligible असा संदेश येत आहे
उत्तर : उमेदवाराची शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता नसणे , दि २२/११/२०१७ पूर्वी आवश्यक अर्हता नसणे, वय निकषापेक्षा अधिक इ. कारणामुळे login वर You are not eligible असा संदेश दिसतो.
प्रश्न : लॉगिन वर You are not eligible असा संदेश येत आहे
उत्तर : उमेदवाराची शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता नसणे , दि २२/११/२०१७ पूर्वी आवश्यक अर्हता नसणे, वय निकषापेक्षा अधिक इ. कारणामुळे login वर You are not eligible असा संदेश दिसतो.
प्रश्न : दिव्यांग (अपंग) उमेद्वारास त्याच्या प्रवर्गाची जागा नसताना जागा दिसत आहे.
उत्तर : दिव्यांग (अपंग) उमेद्वारास त्याच्या प्रवर्गाच्या जागा नसतील तरी शासन तरतुदीनुसार गुणवतेनुसार निवड करण्यासाठी दिव्यांग (अपंग) प्रकाराच्या जाहिरातीतील पदे असतील तेथे त्या त्या दिव्यांग (अपंग) प्रकाराच्या उमेद्वारास जागा दर्शविण्यात आलेल्या आहेत. यासाठी ते पात्र असणार आहेत त्यामुळे त्यांनी त्या त्या पदासाठी प्राधान्यक्रम देता येतील.
प्रश्न : पोर्टल वर सर्व जाहिराती उपलब्ध आहेत का
उत्तर : रिक्त पदासाठी आलेल्या सर्व जाहिराती पोर्टल उपलब्ध आहे तसेच उमेदवार पात्र असणाऱ्या सर्व जाहिराती VIEW ADVT मध्ये WITHOUT INTERVIEW व WITH INTERVIEW या प्रकारानुसार दिसतील.
प्रश्न : ज्या जाहिराती पूर्वी दिसत होत्या त्या आता दिसत नाहीत.
उत्तर : काही जाहिराती मध्ये जाहिरातीतील रिक्त पदा इतकी आरक्षणाची योग्य पदे आलेली नसल्याने पूर्वी काहीना जाहिराती दिसत होत्या त्या आता दिसणार नाहीत. त्यासाठी त्या दुरुस्ती झालेल्या जाहिराती पहाव्यात.
प्रश्न : काही जाहिराती असूनही त्या जाहिरातीतील पदे प्राधान्यक्रमामध्ये आलेली नाहीत.
उत्तर : महाश्वर,मनमाड वाई इ नप व अन्य काही जाहिराती उमेदवारास असूनही त्याचे प्राधान्यक्रम आलेले नाहीत त्यांनी दि २५/०६/२०१९ व २६/०६/२०१९ रोजी आलेली पूर्वीचे दोन्हीही प्राधान्यक्रम DELETE करून नव्याने Generate करावेत. त्यांना त्या जाहिरातीनुसार पात्र असनाऱ्या उमेदवारास दिसतील.
प्रश्न : BMC च्या जागा पूर्वी दिसत होत्या त्या आता दिसत नाहीत
उत्तर : BMC च्या जाहिरातीनुसार व्यावसायिक अर्हता DED,BED इंग्रजी माधमातून झालेले उमेदवारच पात्र असणार आहेत त्यामुळे मागील वेळी आलेल्या काही उमेदवारांना BMC च्या जागा त्या आता दिसत नाहीत.
प्रश्न : आलेले प्राधान्यक्रम ASSIGN,CONFIRM,LOCK करण्याची सुविधा कधी मिळेल
उत्तर : दि २५/०६/२०१९ ते ३०/०६/२०१९ या कालावधीत सुरु राहील. दि ३०/०६/२०१९ नंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही. दि ३०/०६/२०१९ पर्यंत PREFERANCE LOCK करणे बंधनकारक आहे.

प्रश्न : मी एकाच विषयात पदवीधर असताना मला दोन/तीन विषयात प्राधान्यक्रम आलेले आहेत की काय करू
उत्तर : आपणास आलेले प्राधान्यक्रम हे आपण स्व: प्रमाणपत्र मध्ये नमूद केलेल्या विषयातील आलेले आहेत, त्यासाठी आपणास उच्च प्राथमिक ( ६ ते ८ ) / माध्यमिक ( ९ वी ते १० वी ) साठी मान्यताप्राप्त विध्यापिठाची संबधित विषयातील पदवी परीक्षेस अंतिम वर्षास संबंधित विषयातील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार प्राप्त आवश्यक आहे. तसेच उच्च माध्यमिक ( ११ वी ते १२ वी ) साठी मान्यताप्राप्त विध्यापिठाची संबधित विषयातील पदव्युतर पदवी परीक्षेस अंतिम वर्षास संबंधित विषयातील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार प्राप्त आवश्यक आहे. हि तरतूद विचारात घेऊन आलेल्या प्राधान्यक्रमातून योग्य प्राधान्यक्रम LOCK करावेत.

**पवित्र पद भरती बाबत उमेवाराकडून वारंवार विचारले गेलेले/जाणारे प्रश्न (**FAQ)

1. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा म्हणजे कोणत्या शाळा आहेत.

उत्तर : जिल्हा परिषद/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/कटकमंडळ या व्यवस्थापनामार्फत चालविलेल्या शाळा म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागा.

2. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामधील रिक्त पदे कशी भरण्यात येणार आहेत

उत्तर : स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळामधील रिक्त पदे केवळ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) परीक्षेतील गुणांच्या आधारे निवड होणार आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बाबतीत मुलाखत होणार नाही.

3. TET पेपर २ उत्तीर्ण असणारे उमेदवार इ १ ली ते इ ५ वी आणि इ ६ वी ते इ ८ वी साठी अर्ज करू शकतात काय.

उत्तर : होय. शासन निर्णय दि ०३/१२/२०१४ नुसार शिक्षक पात्रता परीक्षा TET पेपर २ उत्तीर्ण असणारे उमेदवार डी.एड उत्तीर्ण असतील तर दोन्ही गटातील पदासाठी पात्र आहेत.

4. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमिक शाळांमध्ये इ ९ वी ते इ १० वी साठी इंग्रजी विषयाच्या जागा असणार आहेत काय

उत्तर : होय.सविस्तर तपशीलासाठी जाहिरात पहाव्यात.

5. इ ६ वी ते इ ८ वी साठी विषय शिक्षक भरती विषयानुसार येणार काय

उत्तर : शासन निर्णय दि ०७/०२/२०१९ व दि.२५/०२/२०१९ नुसार विषय निहाय पद भरती होणार आहे.

6. इंग्लीश मेडीयम मधून डीएड झालेले आहे मी TAIT व TET -१ पास आहे मी मराठी माध्यमासाठी फॉर्म भरू शकतो का

उत्तर आपल्या शैक्षणिक अर्हतेमध्ये मराठी माध्यमातून शिक्षण झालेले असेल तर आपणास मराठी माध्यमाच्या जाहिरातीसाठी अर्ज करता येईल.

7. I am MSC DEd and Bed Tet -१ पास मी ६ ते ८ साठी पात्र आहे काय

उत्तर : TET -२ उत्तीर्ण नसल्यामुळे आपण इ ६ वी ते ८ वी साठी पात्र ठरत नाहीत.

8. समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक व अंशकालीन TET पात्र उमेदवार मिळाले नाही तर त्या जागा त्याच कॅटेगरीतील सर्वसाधारणाला मिळतील काय

उत्तर होय जर त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर मेरीट नुसार त्या त्या प्रवर्गातील सर्व साधारण उमेदवारासाठी उपलब्ध राहतील.

9. १ ते ८ चे रोस्टर एकच असल्याने १ ते ८ साठी Entry point एकच असल्याने Bed झालेले विदयार्थी जिल्हा परिषदेमध्ये ६ ते ८ साठी घेण्यात येणार आहेत का.

उत्तर : होय, निवड करताना गुणवतेनुसार प्राथमिक शिक्षक म्हणून निवड होईल आणि नियुक्तीनंतर जेष्टतेनुसार पदवीधर वेतनश्रेणी लागू होईल.

10. BA Bed ला दोन विषयात पात्र असणारे उमेदवार दोन्ही विषयासाठी पात्र असतील का

उत्तर : पदवी स्तरावर ज्या ज्या विषयात उमेदवार उतीर्ण असेल त्या त्या विषयाच्या जाहिराठीनुसार पदासाठी पात्र असणार आहे.

11. मी मागासवर्गीय प्रवर्गातील आहे परंतु माझे उत्पन्न रु ८.०० लाखापेक्षा जास्त आहे त्या मुळे क्रिमी लेअर गटात मोडत नसल्याने नाही असे केले आहे तर माझा कोणत्या प्रवर्गासाठी विचार होईल

उत्तर : आपण मागासवर्गीय प्रवर्गातील असला तरी आपण क्रिमी लेअर गटात मोडत नसल्याने आपणास खुला प्रवर्गातील जागेसाठी विचारात घेतले जाईल

12. मी obc female उमेदवार असून प्रकल्पग्रस्त आहे तर मला obc general मधून जाता येईल का.

उत्तर : आपल्या पात्रतेनुसार समांतर आरक्षण मध्ये जागा उपलब्ध असल्यास त्या जागासह obc general व खुल्या प्रवर्गातील जागा देखील उपलब्ध होतील.

13. पवित्र पोर्टल वरून शिक्षक भरती साठी SC/ST/OBC व अन्य प्रवर्गातील उमेदवार खुला गटातून अर्ज करू शकतात का

उत्तर : होय उमेदवारांना प्राधान्यक्रम भरण्यासाठी तो ज्या प्रवर्गातील आहे त्या प्रवर्गाच्या आणि खुल्या प्रवर्गाच्या जागा दिसतील त्यामुळे तो पात्र असणाऱ्या सर्व जागा साठी अर्ज करू शकतो

14. उमेदवाराने प्राधान्य क्रम कसे द्यावेत

उत्तर : उमेदवाराची शैक्षणिक,व्यावसायिक अर्हता,प्रवर्ग,शिक्षक पात्रता परीक्षा (TET) विचारात घेऊन पात्र जागा दिसणार आहेत, उपलब्ध जागा विचारात घेऊन जर आपणास उच्च अर्हतेच्या पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यानुसार प्रथम उच्च अहर्तेचे प्राधान्य क्रम भरावेत त्यानंतर उतरत्या क्रमाने प्राधान्य क्रम भरावेत त्यामुळे आपल्या उच्चतम शैक्षणिक पात्रतेनुसार निवडीसाठी उचित रहिल (उदा.जर उमेदवार M.Sc./M.A./M.Com /D.Ed/B.Ed व TET पात्र असेल त्यास इ १ ते १२ पर्यंत च्या सर्व जागा उपलब्ध राहू शकतील अश्या वेळी उमेदवाराने प्राधान्य क्रम भरताना जर उमेदवाराने इ १ ते ५ वी या गटाचा प्रथम प्राधान्य क्रम दिल्यास व त्यानंतर उच्च माध्यमिक किंवा माध्यमिक गटासाठी प्राधान्य क्रम दिला तर या इ १ ते ५ वी या गटासाठी जागा उपलब्ध असल्यास प्रथम दिल्यामुळे निवड होऊ शकते आणि उच्च माध्यमिक किंवा माध्यमिक गटासाठी जागा उपलबद्ध प्राधान्य क्रम नंतर चा दिल्यामुळे निवड होऊ शकणार नाही. प्राधान्य क्रम भरण्याच्या अधिक तपशिलासाठी लवकरच VIDEO देण्यात येत आहे.

15. निवडीसाठी प्राधान्य क्रम कसे विचारात घेणार आहेत.

उत्तर : उमेदवाराने दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार उमेदवाराची TAIT परीक्षेतील गुण,शैक्षणिक,व्यावसायिक अर्हता,प्रवर्ग याबाबीचा विचार करून TAIT परीक्षेतील मेरीटनुसार उमेदवारांनी दिलेल्या प्राधान्य क्रम ज्या प्राधान्य क्रमावर जागा उपलब्ध असेल तो प्राधान्य क्रम निवडीसाठी विचारात घेतला जाईल.त्यापुढील प्राधान्य क्रम विचारात घेतले जाणार नाहीत.

उमेदवारास अश्या प्रकारचे प्रश्न असल्यास edupavitra@gmail.com या email पाठवावेत त्यातील उपयुक्त प्रश्नाचा FAQ मध्ये समावेश करता येईल ज्यामुळे इतर उमेदवारांना प्राधान्य क्रम भरताना मदत होईल.